### आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत बापूसाहेब सोळंकेसह अनेक कार्यकर्त्यांचा शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश

# शेतकरी कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी शेकापचा लाल झेंडा खांद्यावर घेतला : बापुसाहेब साळुंके



**बीड । प्रतिनिधी**

काल माजलगाव येथे पत्रकार संघाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख आले होते , या वेळी चळवळीत काम करणारे बापूसाहेब साळुंके यांच्या सह अनेक तरुणांनी शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी डॉ बाबासाहेब देशमुख यांनी सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करून पक्षात प्रवेश दिल्याचे जाहीर केले पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या,यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कमिटी सदस्य भाई मोहन गुंड, अॅड गोले पाटील उपस्थित होते. बापूसाहेब साळुंके बोलताना म्हणाले की मी अनेक वर्ष सामाजिक काम केले मात्र कुठल्याही विचारधारे शिवाय लोकशाहीत किंमत नाही, शेतकरी कामगार पक्षाचा मागचा इतिहास पाहिला असता मला संघर्षाचा पक्ष म्हणून मी शेतकरी कामगार पक्षाची ओळख आहे. पुढे ही शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर काम करण्यासाठी मला शेतकरी कामगार पक्ष योग्य वाटल्यामुळे शेकापचे अकरा वेळेस निवडून येण्याचा विक्रम करणारे भाई गणपतराव देशमुख यांचे नातू आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या हास्ते माझा प्रवेश घेण्याच भाग्या लाभले यांचा खुप आनंद वाटला. पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील व राज्य कमिटी सदस्य भाई मोहन गुंड यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्यात पुढील काळात शेकापची विचारधारा सर्वसामान्यांच्या पर्यंत पोहोचून शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर काम करणार असल्याचे मात बापूसाहेब साळुंके व्यक्त केले. या वेळी अॅड नारायण गोले पाटील, भाई अशोक रोडे, भाई मुंजा पांचाळ, महेश गायकवाड, इतर सर्व सहकारी उपस्थित होते.

## एआयएमआयएम पक्षाच्या मुख्य कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यावेळीही एआयएमआयएम पक्षाच्या शहरातील बशीरगंज भागात असलेल्या मुख्य कार्यालयात मा.जिल्हाध्यक्ष अॅड. शेख शफीक भाऊ यांच्या हस्ते देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिवसानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. २६ जानेवारी २०२५ रविवार रोजी सकाळी ९:३० वाजता एआयएमआयएम पक्षाच्या मुख्य कार्यालयात मा.जिल्हाध्यक्ष अॅड. शेख शफिक भाऊ यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.यावेळी राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीताचे गायन केले. यावेळी मा.बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुका अध्यक्ष खन्ना भैय्या, जेष्ठ नेते सलाम सेठ, नगरसेवक मोमीन अजहर, मा.मार्गदर्शक रियाज खान, मा. जिल्हा समन्वयक सैफअली लालू, मा. जिल्हा पेंशनर कर्मचारी अधिकारी अध्यक्ष शेख वजीर सर, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, मा. युवक शहराध्यक्ष शेख सलमान, आदी उपस्थित होते.

## चैतन्य धर्मनाथ बीज महोत्सव व प्राणप्रतिष्ठा कलशारोहन कार्यक्रम : राजेभाऊ कुमावत

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ग्रामदैवत चैतन्य धर्मनाथ मंदिर बीज महोत्सव व प्राणप्रतिष्ठा कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यानिमित्त दि.३०/०१/२०२५ रोजी चैतन्य धर्मनाथ यांची मुर्तीची प्राणप्रतिष्ठा निमित्त होम हवन इ. होणार आहे. व दि. ३१/०१/२०२५ रोजी चैतन्य धर्मनाथाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशरोहनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानिमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन दुपारी २ ते ५ या वेळेत केले आहे. तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अवाहन राजेभाऊ कुमावत व



अच्युतराव लाटे, रामेश्वर जमदाडे, भगवान शेजुळ, लहुराव जोगडे, दत्ता येवले, अशोक शेडुते, सुदाम राव आगे, वैभव घोडके, गणेश राठोड, गणेश घाटुळ, ओमप्रकाश राठोड, बजरंग कुमावत, नरेंद्र डुकरे, रामभाऊ दराडे यांनी केले आहे.

## पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा मंजूर लाभार्थ्यांनी कागदपत्राची पूर्तता करून लाभ घ्यावा: आ.सुरेश धस

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत ११ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत.

गावनिहाय ग्रामपंचायत समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

पंतप्रधान घरकुल योजना-ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे




काम हाती घेतले.प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी ६१५७,पाटोदा २९०२,शिरूर कासार २८०५ तिनी तालुक्यात घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्राम पंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे दोन दिवसात करावी.

### केवळबाई गायकवाड यांचे निधन



**केज । प्रतिनिधीं**

तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ महिला केवळबाई फुलचंद गायकवाड वय ६७ वर्ष यांचे सोमवार रोजी सोलापूर येथे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर आनंदगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.त्या ताई नावाने परिचित होत्या. सोलापूर येथे कार्यरत उद्योजक चंद्रकांत गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

## महाराणी ताराबाई विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा; डॉ. वैभव रामनाथ डोईफोडे यांचा सत्कार

**वडवणी । प्रतिनिधीं**

वडवणी येथील,शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन समारंभानिमित्त दि. २६ जानेवारी २०२५ रविवार रोजी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये ध्वजारोहण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आरएसपी व स्काऊट गाईडच्या पथकाने मान्यवरांना मानवंदना दिल्यानंतर ध्वजारोहण सोहळ्याच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा चौसाळा



विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचं ध्वजारोहण करण्यात आले राष्ट्रगीत, राज्य गीत गायन व संविधान उद्देशिकेचे वाचन केल्यानंतर महाराणी ताराबाई मा.व उच्च माध्यमिक विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलच्या यांच्या संयुक्तरीत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक व सत्कार सोहळ्याचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.आ.केशवराव आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून वडवणी पं.स.मा.स.सौ.सुलोचना आंधळे मॅडम होत्या.

## आष्टी पत्रकार भवनात तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**आष्टी । प्रतिनिधीं**

७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार भवन येथे सकाळी ८:४५ मिनिटांनी आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

देशभरात ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्याप्रमाणे आष्टी तालुक्यात देखील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात हा राष्ट्रीय सण




मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार भवन येथे प्रजासत्ताक दिन अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुध्दे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष तथा संपादक दत्ताभाऊ काकडे, गणेश शेठ लाहोटी,पत्रकार भिमराव गुरव, उपाध्यक्ष संतोष सानप,पत्रकार विनोद ढोबळे, सचिव शरद रेडेकर,पत्रकार रघुनाथ कर्डिले, पत्रकार शरद तळेकर,पत्रकार सचिन रानडे, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार मनोज पोकळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्ताने ध्वजारोहण संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधीं**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्ताने महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व उपस्थितांना सजग नागरिकत्वाची शपथ कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता जाधव यांनी दिली. तसेच यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी ध्वजास मानवंदना दिली. उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना माननीय पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

## शांताई अर्बन मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

शांताई अर्बन ह.भ.प.भागवताचार्य रामेश्वर महाराज शास्त्री महाराजांच्या व प्रमुख अतिथी डॉ रमेश घोडके सर व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. ऊर्मिला घोडके मॅडम याच्या हस्ते ध्वजा रोहन करण्यात आले त्यानंतर सामूहिक राष्ट्र गीत म्हंटले, प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतामध्ये आपल्या संरक्षण आणि कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी करतो असे प्रतिपादन केले,भारताला स्वतंत्र मिळण्यासाठी ज्या महात्म्यांनी आपले प्राण पणाला लावले अशा थोर माहात्म्यना पुष्प हार घालून नमन करण्यात आले तसेच महाराजांचा प्रमुख अतिथीचां सत्कर करण्यात आला.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ डी बी शिंदे सर उपाध्यक्ष वाघमारे सर, परमेश्वर शिंदे साईनाथ वाघमारे नितीन जाधव शाम राठोड अमोल मुसळे व संचालक मंडळ तसेच सर्व सभासद पिग्मी एजंट खातेदार व कर्मचारी उपस्थित होते.

## संविधानिक मतदानाचा अधिकार भारतीय लोकशाहीचा आत्मा

**बीड । प्रतिनिधी**

दादापाटील राजळे कला , विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आदिनाथ नगर यांच्या राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात आला. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने राज्यशास्त्र विभाग मार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले तसेच महाविद्यालयातील शिक्षका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी संकल्पपत्र उपक्रम राबविण्यात आला. प्रो .(डॉ) विलास बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सक्रिय सहभाग असणे ही प्रागतिक लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधीं**



अंजनडोह येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिरामध्ये आज दिनांक २५ जानेवारी रोजी गावातील ग्रामस्थ, महिला व विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या शुगर, कावीळ, एच.आय.व्हि., रक्तगट, सी.बी.सी.,के.एफ.टि., एल. एफ. टी., एच.बी.वन.ए.सी., थायॉईड, त्याचबरोबर गावातील किशोरवयीन मुला-मुलींचे, स्तनदा महिलांचे, सहभागी स्वयंसेवकांचे निमिया आणि रक्ताशय (ढ३) या शिबिरामध्ये अंजनडोह गावातील नागरिक व विद्यार्थ्यांच्या मोफत तपासण्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून करण्यात आल्या. यावेळी श्री. डॉ. बाळासाहेब सोळुंके वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय धारूर यांनी या शिबिराचे उद्घाटन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाती डॉ. अमोल दुबे, श्रीमती शिंदे, डॉ. जाधव, डॉ. घरत, प्रयोगशाळा तंत्रज्ञ तिवारी, प्रेमानंद स्वामी, श्री. जाधव आर. एन., राहुल वाडेकर, नासेर शेख, पूजा खाडे, मोफियान शेख, महालॅबचे, महेश सावंत, पुंड मॅडम यांनी कार्य केले. या शिबिराचा लाभ ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने घेतला. यावेळी शिबिराच्या नियोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बाळासाहेब जोगदंड यांनी केले. यावेळी सरपंच,उपसरपंच, ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२५/२०२५, सुनंदा विरुध्द निरंक, (अॅड. शिंदे जी.पी.)**

अर्जदार :- १) सुनंदा भ्र. वसंतराव नाईकनवरे वीर वय ६६ वर्षे धंदा घरकाम, २) जयदत्त वसंतराव नाईकनवरे वय ४० वर्षे धंदा व्यापार, ३) लक्ष्मीकांत पि.वसंतराव नाईकनवरे वय ३८ वर्षे धंदा व्यापार, सर्व रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड ता.जि.बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र** (Heirship Certificate) **मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे वसंतराव बाबुराव नाईकनवरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **वसंतराव बाबुराव नाईकनवरे** रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड ता. जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : ११/१२/२०२४ रोजी बीड, ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क १ या मयाताच्या पत्नी आहेत व अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत वसंतराव बाबुराव नाईकनवरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर **प्रकरणाची पुढील तारीख दिनांक** ०४/०३/२०२५.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का

### जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३७/२०२५**

**साखरबाई ज्ञानोबा मुंडे विरुद्ध ग्रा पं. भवानवाडी (अॅड. सचिन खाडे)**

पहा :- २.साखरबाई पि. ज्ञानोबा मुंडे, रा. भवानवाडी ता. जि. बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून

आर्जदार साखरबाई पि. ज्ञानोबा मुंडे -यांचा जन्म दिनांक-०९/११/१९६२ रोजर झालेला असुन त्यांचे जन्मची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार कार्यालय/ न.प.कार्यालयास भवानवाडी

यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १३/०२/२०२५ ही आहे.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) तहसिलदार बीड करीता

शिक्का

# पत्रकारीता ही समाजातील जागृत ताकद: खा.सोनवणे

## पत्रकारांनी वंचीत, शोषीत घटकांना न्याय देण्यासाठी पत्रकारिता करावी: आ.डॉ.बाबासाहेब देशमुख ; एकता पत्रकार संघाच्या मुकानायक व माजलगाव भुषण पुरस्काराचे थाटात वितरण





**माजलगाव । प्रतिनिधी**

पत्रकारीता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. बीड जिल्ह्यात तर पत्रकारिता अधिक जागृत आहेत. पत्रकारितीमुळे समाजातील उपेक्षित लोकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले जाते,असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप प्रसंगी खा.बजरंग सोनवणे यांनी केले. तर पत्रकारांनी समाजातील वंचीत, शोषीत घटकांना न्याय देण्यासाठी पत्रकारिता करावी असे आवाहन सांगोला विधानसभेचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केले. माजलगाव येथे दि २७ जानेवारी सोमवार रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित एकता पत्रकार संघाच्या मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार वितरण सोहळा दि.२७ जानेवारी सोमवार रोजी आयोजीत केला होता.यावेळी मुकनायक पुरस्काराने दै राज्य लोकतंत्रचे बीड/पुणे येथील संपादक गणेश मोकाशे व सा.घोंगडीचे संपादक बंडु खांडेकर यांचा खा.बंजरंग सोनवणे व आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी व्यासपिठावर बाबुराव पोटभरे, मोहन जगताप, भाई मोहन गुंड, विरेंद्र सोळंके, दयानंद स्वामी, कल्याण आबुज, डॉ.श्रीराम खळगे, युवराज लगड, सुरेश भोरे,भाई नारायण गोले पाटील, कचरू खळगे,विश्वांभर थावरे ,संतोष यादव, सतिष सोळुंके यांची उपस्थिती होती.यावेळी उद्घाटक म्हणून सांगोला विधानसभेचे आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख बोलताना म्हणाले की, पत्रकारांनी समाजातील गोरगरीब कष्टकरी, शेतकरी, कामगार अशा वंचीत, शोषीत घटकांना न्याय देण्यासाठी भविष्यात पत्रकारिता करावी तर अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले,पत्रकारीता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे.बीड जिल्ह्यातील पत्रकार अधिक जागृत असून गोरगरीबांच्या पाठीशी येथील पत्रकार उभा राहतात. गोर-गरीब पिचलेल्या आणि उपेक्षित लोकांना न्याय देण्यासाठी येथील पत्रकार कायम लिहत आलेले असून जिल्ह्यात कोणी चुकीचे वागत असेल तर चुकीला चुक म्हणण्याची हिंमतही पत्रकार दाखवितात. पत्रकारांच्या लेखनीमुळे सामान्य माणसांचा आवाज शासन व्यवस्थेपर्यंत पोहचत आलेला आहे.यापुढे देखील पत्रकारांनी सकारात्मक पध्दतीने पत्रकारीता करून समाजाला जागृत करण्याचे काम करावे,येथील पत्रकार निर्भीडता कायम ठेवतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.यावेळी या कार्यक्रमाचे आयोजकांचे कौतुक करत अनेक क्षेत्रातील उत्कृष्ट काम करण्याऱ्या लोकांचा सन्मान आपण करत आहेत,ही अभिमानाची गोष्ट आहे. आजच्या तारखेमध्ये मंत्रीमोहदय यांच्या भेटीची वेळ असताना आपण या कार्यक्रमाला येणं महत्त्वाचं मानले,असा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.

### माजलगाव भुषण पुरस्काराने यांचा झाला सन्मान

**माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तालेब चाऊस (सामाजिक कार्य), सुनिल रुद्रावार (सहकार), अंबादास रोकडे (उद्योग), डॉ.दिनकर मस्के (आरोग्य), ॲड.टि.एन.कोल्हे (विधीज्ञ), बाळासाहेब कदम (भुमी पुत्र), सरपंच आजय शिंदे (आदर्श सरपंच ), तलाठी रामेश्वर थापडे (उत्कृष्ट तलाठी), हानुमत राऊत (उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी) यांचा मान्यवरांच्या हस्ते माजलगाव भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

---

## मांजरसुंबा-केज रस्त्या जागोजागी फाटला कुठं कुठं ठिगळ लावणार रस्त्याची कसलीच लेवल लागेना, अपघाताची शक्यता वाढली

**नेकनूर । प्रतिनिधी**



अनेक वर्षापासून रेंगाळत चाललेल्या अहिल्यानगर - अहमदपूर मार्गाचे काम मांजरसुंबा-केज दरम्यान दर्जाहीन झाल्याने रस्त्यात अनेक ठिकाणी मोठमोठ्या भेगा पडल्या खड्डे पडले यामुळे अपघाताही वाढले ओरड होत असल्याने अखेर संबंधित कंपनीने या मार्गावरील भेगा पडलेला भाग उखडून दुसरा भाग अंथरण्याचे काम सुरू केले असले तरी याची कसलीच लेवल जुन्या नव्या रस्त्यात नसल्याने चढ उताराने पुन्हा अपघात घडण्याची भीती वाहनधारकांतुन व्यक्त होत आहे .उलट ही मलमपट्टी अपघाताला निमंत्रण देणारी ठरू शकते.

मांजरसुंबा- केज सिमेंट रस्त्याचे काम , फुटपाथ, नाली काम अपूर्ण असल्याने मागच्या दोन वर्षात केज जवळील टोल उभा करून बंद ठेवण्याची नामुष्की संबंधित रस्ता कंपनीवर आली या दोन वर्षात मात्र हा रस्ता अनेक ठिकाणी फाटला मोठं मोठ्या भेगा पडल्याने या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले. मोठी ओरड होत असल्याने सध्या या रस्त्यावर खराब भाग कट करून पुन्हा नव्याने सिमेंटचा थर देण्याचे काम सुरू असून याची आणि जुन्या रस्त्याची लेवल लागत नसल्याने चढ उतार दिसून येत आहे यामुळे अपघात थांबतील का वाढतील असा प्रश्न उपस्थित होत असून या मार्गावर बहुतांश भाग खराब झाल्याने कुठे कुठे ठिगळं जोडणार असा सवाल वाहनधारकांतुन उपस्थित केला जात आहे.सुरवातीपासूनच या मार्गाचे काम व्यवस्थित होत नसल्याची ओरड झाली अगदी ज्यांच्यामुळे हे रस्ते मिळाले ते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापर्यंत तक्रारी केल्या गेल्या मात्र या एचपीएम नावाच्या रस्ता कंपनीने कामात पाहिजे तशी सुधारणा केली नाही यामुळे दोन वर्षातच अनेक किलोमीटर रस्ता फाटला गेला आता यावर सुरू असलेली मलमपट्टी ही केवळ टोल सुरू करण्यासाठी सुरू असल्याचे दिसून येत असून यामुळे अर्धवट पडलेले कामे कंपनीने हाती घेतले असले तरी यात दर्जा,लेवल नसल्याचे पहायला मिळत आहे.

मांजरसुंबा-केज प्रवासात अनेक ठिकाणी रस्ता भेगामय झाल्याने यामार्गावर प्रवास जोखमीचा होता सध्या याची दुरुस्ती करण्यात येत आहे मात्र या रस्त्याची लेवल नसल्याने वाहनावरचे नियंत्रण सुटून अपघात वाढले आहेत रस्ता दुरुस्ती करताना लेवलकडे लक्ष देणे गरजेचे आहे.- अमरजीत भास्कर शिंदे,वाहनधारक प्रवाशी

---

## मतदार संघामध्ये एक लक्ष भाजप सदस्य नोंदणी करावी आमदार सुरेश धस यांचे आवाहन

### जि.प.,पं.स. निवडणूकीतील विजयासाठी परिश्रमाचे दिले संकेत

**आष्टी । प्रतिनिधी**



देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांचा विजयाचा स्ट्राईक रेट हा ८९% एवढा आहे भारतीय जनता पार्टीचे विचार तळागाळात पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये एक लक्ष सदस्य नोंदणी करावी असे आवाहन करून आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असून त्यांच्या विजयासाठी परिश्रमपूर्वक काम करून जीवाची रान करीन आणि कार्यकर्त्यांना निवडून आणि असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी संवाद बैठकीमध्ये बोलताना व्यक्त केला आष्टी येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीमध्ये ते प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते ते पुढे म्हणाले की विधानसभा निवडणुकीतील माझा विजय हा अपेक्षितच होता एक लक्ष मताधिक्याने विजयी झालो असतो परंतु पक्षात आणि महायुतीत माझा पराभव व्हावा या दुष्ट हेतूने बंडखोरी झाल्याने विजय ८० हजार मताधिक्यावर आला आता माझी निवडणूक संपली आहे.

---

## बंडू खांडेकर मूकनायक पुरस्काराने सन्मानित

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



संपादक तथा जेष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर यांना त्यांच्या पत्रकारितेतील महत्त्वपूर्ण योगदानासाठी एकता पत्रकार संघाच्या वतीने मूकनायक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या दिमाखदार सोहळ्यात संगोल्याचे आमदार भाई डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करुन त्यांना मूकनायक पुरस्कार बहाल करण्यात आला. सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, खा. बजरंग सोनवणे, छत्रपती सह.साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे, माजलगाव सह. साखर कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक दिनानिमित्त मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

### पुरस्कार मित्राला समर्पित

**रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद घेऊन राज्यभरातील आरोग्यसेवेचा वसा देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी घेतला आहे. त्यांच्या माध्यमातून केलेल्या कामाची पावती म्हणून मिळालेला हा मूकनायक पुरस्कार आपण मित्रवर्य डॉ.शेटे यांना समर्पित करत असल्याचे बंडू खांडेकर म्हणाले. आपल्याला मिळालेला प्रतिष्ठेचा पुरस्कार जिवलग मित्राला बहाल करुन खांडेकर यांनी मैत्रीच्या नात्याची वीण किती घट्ट असू शकते याची प्रचिती दिली आहे.**



*७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. भीमराव पिंगळे विद्यालय येथे संस्था सचिव, मा. युवराज भैय्या जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डोंगरदिवे सर शाळेचे विद्यार्थी आणि सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.*

---

## शिराळे पाटील यांच्या घरी हळदी कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील ज्येष्ठ नेते तथा भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा देव देश आणि धर्म या कार्यासाठी अहोरात्र परिश्रम करून सर्वांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होणारे व प्रत्येक धर्म कार्यामध्ये अतिशय मोलाचा वाटा उचलणारे मग अखंड हरिनाम सप्ताह असो किंवा श्रीमद् भागवत कथा असो किंवा श्री गुरुचरित्र पारायण सोहळा असो या सर्व धार्मिक कार्यामध्ये ते सातत्याने धार्मिक सेवा करून प्रत्येक ठिकाणी ते आर्थिक मोठी धर्मासाठी मदत ही करतात एक ठिकाणी श्री संत तुकाराम महाराज देखील सांगतात की सत्य कर्मा व्हावे सहाय्य घातलीय भय नरका जाणे या संत वचनाप्रमाणे या प्रमाणे म्हणून या वर्षी देखील मकर संक्रांतीच्या पर्व काळावर त्यांनी त्यांच्या निवासस्थानी म्हणजेच ओम नमो सदन या निवासस्थानी बीड शहरातील सर्व सुवासनी महिलांसाठी हळदी कुंकवाचा महोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला गेली २५ वर्षापासून ही परंपरा हळदी कुंकवाची नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांच्या निवासस्थानी हळदी कुंकवाचा हा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अत्यंत मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणाच्या जल्लोषात हा महोत्सव साजरा करण्यात आला यावेळी महिलांचे औक्षण सौं रुक्मिणी बाई नवनाथ शिराळे व मालन गोरख शिराळे सोनम गोविंद शिराळे श्रावणी कृष्ण शिराळे ऋतुजा गणेश शिराळे या महिला भगिनींनी सर्व महिलांना हळदी कुंकवाच्या निमित्ताने एक वाण ववसा म्हणून एक श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा श्री हरिपाठ पवित्र ग्रंथ येथे उपस्थित असलेल्या सर्व महिलांना वान ववसा म्हणून वाटप करण्यात आले याच बरोबर महिलांना चहापाण्याऐवजी उसाचा थंडगार उत्कृष्ट आणि चवदार चांगल्या उसाचा रस महिलांना व लाहन बाळांना रसाचे वाटप या वेळी करण्यात आलं .

---

### शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था,बीड संचलित-शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन आदरणीय श्री. अरुणरावजी (नाना) डाके (मा. सभापती, कृ.उ.बा.समिती, बीड), विद्यालयाचे प्राचार्य श्री.येडे व्ही.बी.सर्व मान्यंवर, प्राध्यापक व शिक्षक यांनी केले.ध्वजारोहन मा.श्री. अरुणरावजी (नाना) डाके यांच्या हस्ते करुन स्वागत गिताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयाच्यावतीने सर्व मान्यंवरांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

---

## सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे: रिपाई नेते विजय दादा साळवे

**माजलगाव । प्रतिनिधी**



परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या संविधान प्रेमी शहिदाच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी रिपाई नेते विजय दादा साळवे यांनी परभणी ते मुंबई येथे निघालेल्या लाँगमार्च मध्ये आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना प्रतिक्रिया दिली. त्यांच्यासोबत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते लाँग मार्चमध्ये ज्येष्ठ नेते कचरू तात्या खळगे, डॉ. खळगे, अंकुशराव जाधव, पत्रकार किशन भदर्गे, दीपकराव टाकणखार, दिलीपराव मक्सरे, राजकुमार सोनवणे, डी एस साळवे , वडवणीचे उजगरे,प्रकाश खळगे सर इत्यादी सहभागी झाले आहेत . याबाबत अधिक माहिती अशी की सोमनाथ सूर्यवंशी हे कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी होते व ते ङ.ङ.इ. च्या परीक्षेची तयारी करीत होते अशा या कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याने कोणतीही दगडफेकी केली नव्हती किंवा कोणत्याही सीसीटीव्ही किंवा व्हिडिओ कॅमेरात ते दिसून आलेले नसतांनाही संविधानाच्या प्रतिमेची मोडतोड करून परभणीत दंगल कडून आणण्याचा प्रयत्न काही जातीवाद्यांनी केला होता व या परभणी शहरांमध्ये जे संविधानाच्या प्रतीकृतीची मोडतोड केली म्हणून परभणी जिल्हा बंद पुकारलेल्या संविधान प्रेमी नागरिकांनी कोणतेही असंवैधानिक काम केले नव्हते परंतु मोडतोड करून भारत देशाशी गद्दारी करणाऱ्यानी संविधानाची मोडतोड करून ज्या लोकांनी परभणी शहरांमध्ये व पर्यायाने महाराष्ट्रभर दंगली घडवून आणण्याचा कट काही जातीवाद्यांनी रचला होता व त्याचाच भाग म्हणून परभणी


